# जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

टोकरतलाव रोड, नंदुरबार ता.जि. नंदुरबार

दुरध्वनी क्रमांक : ०२५६४–२१०१५१ ईमेल आयडी mahdhunansc@aij.gov.in

म.जा.क्र. (रो.व.वि.)१८६२/२०२४ दिनांक:–30/०८/२०२४

**विषय :– KYOCERA Ecosys M2040dn कंपनीच्या लेझर प्रिंटरसाठीचे Genuine/ Original 20 नग कार्टेज पुरविणेकामी निवीदा सादर करणेबाबत.....**

उपरोक्त विषयांस अनुसरुन व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. नंदुरबार यांचे आदेशान्वये कळविण्यात येते की, म. जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार करीता **KYOCERA Ecosys M2040dn कंपनीच्या लेझर प्रिंटरसाठीचे Genuine/ Original 20 नग कार्टेजची आवश्यकता आहे.**

त्याकरीता नोदंणीकृत विक्रेत्याकडुन निवीदा मागविण्यात येत आहेत. तरी आपण सदर निविदा जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार टोकरतलाव रोड, नंदुरबार या पत्यावर सिलबंद पाकिटात **दिनांक ०३/०९/२०२४** रोजी किवा त्यापुर्वी **साय. ५:००** वाजेपर्यत या कार्यालयात सादर करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

## सर्वसाधारण अटी

१. निवीदेतील **कार्टेजचा** दर्जा उत्कृष्ट व उच्च प्रतीचे **Genuine/ Original** असावे अन्यथा सदरचे **कार्टेज** आपणांस परत करण्यात येईल व **कार्टेज हे** नव्याने तात्काळ बदलुन पुनश्च पुरवावे लागेल व त्याचे कुठलेही अतिरिक्त देयक दिले जाणार नाही.

२. सदरील **कार्टेज** पुरविल्यानंतर संबंधीत विभाग प्रमुखचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदर **कार्टेज** देयक सहा. अधिक्षक, रोख व वित्त विभाग यांचे मार्फत पारीत केले जाईल.

३. सदरील **कार्टेज** नंदुरबार जिल्हा न्यायालयात पोच करुन देण्याची जबाबदारी विक्रेत्यावर राहिल.

४. देयकाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर विक्रत्यास CT-GST पावती देणे बंधनकारक राहिल.

५. उपरोक्त पुरवठा सदरील कार्यालयात स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे आदेशपत्र मिळाल्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या ०७ दिवसांच्या आत करावा लागेल. तसेच सदर **कार्टेज** चे उधारीचे देयक जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांच्या नावाने सादर केल्यानंतर देकांची रक्कम आपणांस अदा करण्यात येईल.

६. सदर निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो, नंदुरबार यांचेकडे राखुन ठेवण्यात आला आहे. तसेच सदर पुरवठादार विक्रेत्याने केलेला पुरवठा समाधानकारक नसल्यास तक्रार संगणक विभागामार्फत प्राप्त झाल्यास दरपत्रक कुठल्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., नंदुरबार यांचे कडुन राखुन ठेवण्यात येत आहे.

आदेशावरुन,

प्रबंधक,

जिल्हा व सत्र न्यायालय, **नंदुरबार**

प्रत योग्य त्याकार्यवाहीस्तव :–

१. नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार,
२. संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार,
यांना जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटवर अपलोड करणेसाठी